# <u>अधिसूचना</u>

क्र.उविअगो/प्रस्तु-३/अका/कावि/ ६३६ /२०१७
कार्यालय- उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी गोंदिया
दिनांक:- १६/०६/२०१७

**भुमिसंपादन, पुनर्बसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा अणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ अन्वये थेट खरेदी पध्दतीने जमीन भुसंपादन करण्यासाठी अधिसूचना**

**मौजा- मोरवाही तालुका- गोंदिया जिल्हा- गोंदिया**

गोंदिया तालुक्यातील, दत्तोरा - मोरवाही रस्त्याच्या बांधकामा करीता असलेली मौजा- मोरवाही येथिल सर्व्हे क्र. ९३२, ९३३, ९३५, ९३६ मधील पैकी **०.२९** हे.आर. खाजगी जमीन शासन निर्णय क्र./संकिर्ण/०३/ २०१५ /प्र.क्र.-३४/अ-२ मुंबई-३२ दिनांक ३०/०९/२०१५ च्या अनुषंगाने थेट खरेदी पध्दतीने खाजगी जमीन संपादन करावयाचे आहे.

**संपादन संस्थेचे नाव:- कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग क्र. १ गोंदिया** यांनी जमीन मालकाशी परस्पर संपर्क साधून, थेट खरेदी पध्दतीने भुसंपादन करण्या संबधी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने संपादन संबधित भुधारकाने सम्मती दिली आहे.

**प्रकल्पाचे प्रयोजन:- दत्तोरा मोरवाही रस्त्याच्या बांधकामा करीता हे आहे.** शासन, महसुल व वनविभाग, परिपत्रक क्र. एलक्यूएन - ०१ / २०१७ / प्र. क्र. १२ /अ - २, दिनांक २५/०१/२०१७ च्या अनुषंगाने, उपविभागीय अधिकारी, तथा भुसंपादन अधिकारी गोंदिया यांच्या कार्यालया कडून, भुसंपादन संस्थेच्या वतीने खालील दिलेल्या अनुसूची नुसार खाजगी जमीन भुसंपादना संबधी खालील दिलेल्या अनुसुची नुसार प्रसिध्द करण्यांत येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या नुसार खालील दिलेल्या प्रमाणे **खाजगी जमीन संपादना संबधी दस्तावेज व नकाशे उपविभागीय अधिकारी, तथा भुसंपादन अधिकारी, गांदिया यांच्या कार्यालयात, कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध राहील.**

## <u>अनुसूची-एक</u>
## <u>जमिनीचे वर्णन</u>

थेट खरेदी पध्दतीने जमीन संपादन करणे बाबत. तपशील मौजा- मोरवाही तालुका-गोंदिया जिल्हा- गोंदिया

| अ.क्र. | भुमापन किंवा गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| १ | ९३२ | ०.०६ |
| २ | ९३३ | ०.०१ |
| ३ | ९३५ | ०.१२ |
| ४ | ९३६ | ०.१० |
| एकुण- ४ | | **०.२९** |

## अनुसूची- दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्परूपा बाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| संपादन संस्थेचे नाव | :- | कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग क्र. १ गोंदिया |
| प्रकल्पाचे प्रयोजन | :- | दत्तोरा- मोरवाही रस्त्याच्या बांधकामा करीता भुसंपादन करणे |
| समाजाला मिळणारे लाभ आर्थिक रोजगार, पायाभूत सुविधा, सोईसुविधा याबाबत व इतर लाभ संबधात. | :- | सामाजिक कल्याण साधण्या करीता, जनतेला वाहतुकी साठी रस्ते सुविधा उपलब्ध करून देणे, पर्यायाने सामाजिक कल्याण व लोकहित साधणे. |

## अनुसूची-तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यांस भाग पाडणारी कारणे:- कुणीही व्यक्ती किंवा कुटंब विस्थापित होत नाही.

## अनुसूची-चार

| | |
|---|---|
| सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश:- (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) | भुमी संपादन पुनर्वसन, व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ चे कलम १० क व त्या अनुषंगाने महसूल व वनविभाग महाराष्ट्र शासन यांची अधिसूचना दिनांक १३ मार्च २०१५ अन्वये सामाजिक प्रमाण निर्धारणातून सूट. |

## अनुसूची-पाच

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यांत आलेल्या अधिका-यांचे पदनाम:- निरंक

ब. प्रशासनाचा कार्यालयाचा पत्ता :- निरंक

क. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यांत आली आहे. त्या :- निरंक

अधिसुचनेचा तपशील विस्तृत विवरण (निर्गमित करण्यापुर्वी भरावे.)

**टिप:- उक्त जमिनीच्या आराखडयाचे भुसंपादन जमिनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, गोंदिया या कार्यालय मध्ये निरीक्षण करता येईल.**

उपविभागीय अधिकारी
तथा भुसंपादन अधिकारी,
गोंदिया

(उपविभागीय अधिकारी तथा भूअर्जन अधिकारी गोंदिया)

दिनांक:- १७/०६/२०१७.
ठिकाण:- गोंदिया